महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती.
दूरध्वनी क्र२६६२६४७-०७२१.,ई मेल divsecamt@rediffmail.com

पत्र क्र अविमं/आस्था/ १७२६
अमरावती
दिनांक ०३.१२.२०२१.

**कार्यदेश**

प्रति,
व्यवस्थापक,
मे.सरस्वती सेक्युरिटी सर्व्हीसेस ,
अमरावती.

विषयः- कंत्राटी लिपीक,शिपाई,वाहनचालक,सफाई कामगार,हमाल यांचा पुरवठा करणेबाबत.
संदर्भः-१. अविमं/भांडार/निविदा/१४८५,दि.०३.११.२०२१.
२.अविमं/आस्था/१७२५ ,दि.०३.१२.२०२१.
३.मे.सरस्वती सेक्युरिटी,अमरावती यांचे दि.०३.१२.२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सन २०२१-२२ करीता नोंदणीकृत कंत्राटी लिपीक,शिपाई,वाहनचालक व सफाई कामगार पुरवठा करण्याबाबत कार्यालयाकडून मागविलेल्या ई निविदा प्रक्रियेमध्ये आपली पुरवठादार निविदाकारक म्हणून निय करण्यात आलेली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये आपणास निविदेतील अटी व शर्तीनुसार सुरक्षा ठेव/ अनामत रक्कम रूपये १,२०,०००/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) मंडळात जमा करणेबाबत व कार्यालयासोबत करावयाचा करारनामा आवश्यक मुद्रांक शुल्कासह(स्टॅम्प) त्वरीत कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.त्याअनुषंगाने आपण संदर्भ क्र.३ नुसार मागील करारा मंडळाकडे जमा असलेले १,००,०००/- अनामत रक्कम या सन २०२१-२२ च्या कराराकरीता ग्राह्य धरण्यात येवून रू.२०,०००/- ची रक्कम मंडळात जमा करीत असल्याची विनंती केली असल्याने आपली मागणी मान्य करण्यात आली असून मागील कराराकरीता मंडळाकडे जमा असलेली रक्कम ग्राह्य धरण्यात येत आहे. तसेच आपण विहीत शुल्कासह करारनामा सादर केलेला आहे.

करीता आपणास या कार्यादिशान्वये कळविण्यात येते की, दि.०६.१२.२०२१ ते ०५.१२.२०२२ या एक वर्षाच्या कालावधीकरीता करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अनुषंगाने आपण कार्यालयाला आवश्यकतेनुसार नोंदणीकृत कंत्राटी लिपीक,शिपाई,वाहनचालक,सफाई कामगार व हमाल यांचा पुरवठा करावा.

( निलिमा टाके)
विभागीय सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती